| MHSO070003392010 | नियमित दरखास्त क्र. २७/२०१० मधील निशाणी क्र. ९४ वरील आदेश<br>(पारीत दिनांक ०७ मे २०२६) |
|---|---|

१.        वादीने प्रस्तुतचा अर्ज हा निशाणी क्र.७९ प्रमाणे कब्जे वारंटची बजावणी होत असताना पोलीस मदत ही ग्रामीण पोलीस ठाणे यांच्याकडून मिळावी यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादीने त्याचे म्हणणे सादर केले नाही. धनको यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२.        निशाणी क्र.७९ प्रमाणे अर्ज दाखल करतेवेळी धनको यांनी पोलीस निरीक्षक, तालुका पोलीस स्टेशन, पंढरपूर यांना पत्र देण्यात यावे अशी विनंती केली होती. सबब, सदर अर्जावर आदेश पारीत करतेवेळी पोलीस निरीक्षक, तालुका पोलीस स्टेशन, पंढरपूर यांना आदेशित करण्यात आले होते. परंतु, वादी याचे गांवे शेळवे गांव हे ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याने तालुका पोलीस स्टेशन येथील पोलीस कर्मचारी बंदोबस्तासाठी व कब्जे वारंटच्या बजावणीसाठी उपलब्ध होऊ शकत नाही. शेळवे गांव हे ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याने धनको यांनी प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.७९ वरील आदेशात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केला आहे. धनको याचेकडून नजरचुकीने पोलीस ठाण्याचे नांवे चुकीचे देण्यात आल्याने चुकीचा आदेश पारीत करण्यात आलेला होता. अर्जामध्ये नमुद केलेली कारणे लक्षात घेता आणि हुकुमनाम्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस निरीक्षक, ग्रामीण पोलीस स्टेशन, पंढरपूर यांना आदेशित करणे आवश्यक आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१.    अर्ज (निशाणी क्र. ९४) मंजुर करण्यात येत आहे.

२.    निशाणी क्र.७९ वरील आदेशामध्ये ज्या–ज्या ठिकाणी 'पोलीस निरीक्षक, तालुका पोलीस स्टेशन, पंढरपूर' असा उल्लेख आला

आहे त्याठिकाणी 'पोलीस निरीक्षक, ग्रामीण पोलीस स्टेशन, पंढरपूर' अशी दुरुस्ती करण्यात येते.

३. संबंधित लिपीकाने या प्रमाणे कब्जे वारंट पुन्हा पाठवण्याची कार्यवाही करावी व यापुर्वी आदेशित केलेल्या आदेशांसमवेत प्रस्तुत आदेशाची प्रत पोलीस निरीक्षक, ग्रामीण पोलीस स्टेशन, पंढरपूर यांना पाठवावी.

SONALI SHASHIKANT RAUL

Digitally signed by SONALI SHASHIKANT RAUL
Date: 2026.05.07 16:10:51 +0530

(एस.एस.राऊळ)

दिनांक – ०७.०५.२०२६.

सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पंढरपूर,
जि. सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | D.S.Landage, Stenographer (Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) Pandharpur, Dist. Solapur. |
| Date | :- | 17.04.2026. |
| Order signed by the presiding officer on | :- | 17.04.2026. |
| Order uploaded on | :- | 17.04.2026. |